मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारीचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा – 2013 – 2023)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पी.एच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

-: संशोधक :-

श्रीमती मोहम्मदी कौसर सलीम खान

(एम.ए.मानवी हक्क, एम.ए. अर्थशास्त्र, एम.एस.डब्ल्यू, एल.एल.बी.)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ.अजय प्रभाकर कुंटे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक

नारायणराव वाघमारे महाविद्यालय,

आखाडा बाळापूर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली.

-: संशोधन केंद्र :-

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

PET – 2021

मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारीचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा–2013–2023)

प्रस्तावना:–

मानवी क्षमता उंचावण्यासाठी रोजगाराची खूप महत्वाची भुमिका असते. त्यामुळे केवळ वैयक्तीक आर्थिक सुरक्षाच नव्हे तर लोकांचा समाजात व अर्थव्यवस्थेत सहभाग वाढण्यासाठी प्रोत्साहन मिळते. रोजगारामुळे व्यक्ती बरोबरच त्याच्यावरील अश्रीतांनाही आरोग्य व शिक्षणाच्या चांगल्या सुविधा प्राप्त होतात. तसेच रोजगारामुळे व्यक्तीच्या आत्मसन्मानाचा भावनेत भरत पडते. मात्र आज देशासमोर आपल्या वाढतच असलेल्या श्रमशक्तीस उत्पादक व लाभदायक रोजगार उपलब्ध करून देऊन समावेशी वृद्धी साध्य करणे हे एक मोठे आव्हाण आहे. बेरोजगारीची व्याख्या करणे मुलत: अवघड आहे.

1) कोणत्या वयोगटातील व्यक्तींचा समावेश केला जावा?
2) घरगुती उद्योगात विनावेतन काम करणा-या कुटूंबातील सभासदांची गणना कोठे करावी?
3) किमान किती काळ काम केल्यास व्यक्तीला रोजगार उपलब्ध आहे असे म्हणावे?
4) तात्पुरत्या कारणाकरिता व्यक्ती बेरोजगार झाल्यास तीची गणना कोठे करावी?

वरिल प्रकारे अशा अनेक अडचणी बेरोजगारीची व्याख्या व मापन करतांना येतात. व त्या त्या वेळी धोरणात्मक उद्देशानुसार बेरोजगारीची व्याख्या व मापन केले जाते. तथापि, सर्वसामान्यपणे बाजारात चालू असलेल्या वेतनाचा दर स्विकारून काम करण्याची तयारी असणा-या सक्षम कामक-याला जर काम मिळू शकले नाही, तर

त्याची गणना बेरोजगार म्हणून करता येईल, आणि अर्थव्यवस्थेतील अशा स्थितीला बरोजगारीची परिस्थिती म्हणता येईल.

रोजगार नसलेल्या परंतू रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बरोजगार म्हणता येईल. रोजगार मिळविण्यासाठी उत्सुक असलेली ही व्यक्ती त्यासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या समर्थ असावी, तीची काम करण्याची इच्छा असावी, तसेच समाजातील प्रचलित दरावर काम करण्याची तिची इच्छा असावी या तीन्ही अटी पुर्ण करणा-या व रोजगार मिळविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केल्यानंतरही रोजगार न मिळालेल्या व्यक्तीला बेरोजगार म्हणता येईल.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटना (NSSO) ने बरोजगारीची व्याख्या अशी केली आहे. बेरोजगारी म्हणजे अशी परिस्थिती ज्यामध्ये रोजगाराची उपलब्धता नसल्याने व्यक्ती काम करीत नाहीत. मात्र विविध मार्गांनी ते कामाच्या शोधात आहेत कामासाठी उपलब्ध आहेत.

भारतातील बेरोजगारीचे स्वरूप / समस्या ग्रामीण व शहरी भागात वेगवेगळी आहे.

1) ग्रामीण भागातील बेरोजगारी मुख्यत: कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. ग्रामीण लोकसंख्या खूप मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रात कार्यरत असल्याने विविध प्रकारची बेरोजगारी निर्माण होते. कमी प्रतीची हंगामी व प्रच्छन्न बेरोजगारी.

2) शहरी बेरोजगारी ग्रामीण बेरोजगारीचाच एक विस्तार आहे. ज्याच्या निर्मितीचे प्रमुख कारण ग्रामीण् ते शहरी स्थलांतर हे आहे. शहरी बेरोजगारी मुख्यत: खुली बेरोजगारी व सुशिक्षित बेरोजगारी या स्वरूपात आढळते.

बेरोजगारीच्या मोजमाप पद्धती :-

भारतात रोजगार व बेरोजगार आकडेवारी 03 प्रमुख स्त्रोत आहेत.

1) दशवार्षिक जनगणनेचे अहवाल

2) राष्ट्रीय नमुना पाहणीचे रोजगार व बरोजगार स्थितीचे पंचावार्षिक अहवाल.

3) रोजगार प्रशिक्षण महासंचालनालय (DGET) यांनी पुरविलेली Employment Exchange कडील नोंदणी बद्दलची आकडेवारी याशिवाय संघटीत क्षेत्रातील रोजगार विषयक माहिती कारखाना अधिनियम 1948 नुसार नोंदणी झालेल्या कारखान्यांकडून अनिवार्य विवरण पत्राद्वारे प्राप्त होते. या व्यतिरिक्त रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम हा सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या आस्थापनातील रोजगारांची माहिती उपलब्ध करून देतो.

नुकत्याच जाहीर झालेल्या इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या माहितीनुसार 15 मार्च 2020 पर्यंत भारतातील बेकारी 6.74 टक्के इतकी होती. ती जुलै 2023 पर्यंत 7.95 टक्के इतकी झपाट्याने वाढली आहे. भारतातील शहरी भागात बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे 7.93 टक्के असून ग्रामीण भागातील बेकारीचे प्रमाण 7.44 टक्के इतके वाढले आहे.

भारतातील द्रारिद्याची समस्या ही प्रामुख्याने बेरोजगारीतूनच उद्धवलेली आहे, हे विधान सर्वमान्य होण्यास हरकत नसावी. भारतातील 30 टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या दारिद्र्यात जीवन कंठीत आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर भारतात ब-याच मोठ्या प्रमाणावर बेकारी व बेरोजगारी आहे तथापि, भारतातील बेकारी ही संरचनात्मक हंगामी व घर्षणात्मक आहे. तसेच अविकसीत देशांतून अनुभवाला येणारी अर्धबेकारी आणि छुपी बेकारी भारतासारख्या कृषिप्रधान देशात आहे.

ग्रामीण व शहरी बेरोजगारीचे स्वरूप बेरोजगारीच्या पुढील प्रकारांद्वारे स्पष्ट होईल.

1) खुली बेरोजगारी :-

- काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही नियमित उत्पन्न देणारा रोजगार प्राप्त होत नसेल तर त्याला खुली बेरोजगारी असे म्हणतात.
- उदा. ग्रामीण भागातील स्वत:च्या मालकीची शेत जमीन नसलेले अकुशल व अर्धकुशल कामगार, रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरी भागात आलेले बेरोजगार इ.

2) हंगामी बेरोजगारी:-

- शेतीचा नांगरीपासून कापणीपर्यंतचा कालावधी सोडून वर्षाच्या इतर काळात भासणारी बेरोजगारी.

3) अदृश्य/प्रच्छन्न बेरोजगारी:-

- आपल्या क्षमतेचा पुर्ण वापर करून एखादे काम जेवढे व्यक्ती क डिग्री शकतात त्यापेक्षा जास्त व्यक्ती त्या कामात गुंतलेले असल्यास ते जास्तीचे व्यक्ती अदृश्यपणे / प्रच्छन्नपणे बेरोजगार आहेत असे म्हटले जाते.
- उदा.शेतीचे एक क्षेत्र जर एक व्यक्ती आपल्या क्षेमतेचा वापर करून पिकवू शकतो तर त्याऐवजी 4-5 लोक तेथे काम करीत असल्यास ते प्रच्छन्नेपणे बेरोजगार असतात.
- सकृतदर्शनी या व्यक्तींचे काम उत्पादक स्वरूपाचे मुळीच नसते. म्हणजेच त्यांची सीमान्त उत्पादकता शुन्य किंवा नाममात्र असते. कारण अशा व्यक्तींना व्यवसायातून बाजूला सारले तरी त्यामुळे उत्पादनाच्या पातळीवर मुळीच विपरीत परिणाम होत नाही.

4) कमी प्रतीची बेरोजगारी:-

- ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला आपल्या क्षमतेपेक्षा / कार्यक्षमतेपेक्षा / शिक्षणाच्या दर्जापेक्षा कमी प्रतीच्या रोजगारावर समाधाना मावाने लागते त्यावेळी तिला कमी प्रतीची बेरोजगारी असे म्हणतात.
- उदा. एखाद्या इंजिनिअरला क्लार्कची नौकरी करावी लावणे.

5) सुशिक्षित बेरोजगारी :-

- जेव्हा सुशिक्षित लोक कमी प्रतीच्या किंवा खुल्या बेरोजगारीला बळी पडतात तेव्हा त्याला सुशिक्षित बेराजगारी असे म्हणतात.

6) चक्रीय बेरोजगारी:-

- विकसित देशांमधील व्यापारी चक्राच्या मंदीच्या परिस्थितीत जी बेरोजगारी दिसून येते तिला चक्रीय बेरोजगारी असे म्हणतात.

7) घर्षणात्मक बेरोजगारी :-

- विकसीत देशांना जेव्हा नविन उद्योग जुन्या उद्योगांना आपल्या व्यवसायातून बाहेर पडण्यास भाग पडतात व कामगार ऐच्छिकरित्या बेरोजगार असतो तेव्हा त्या परिस्थितीला घर्षणात्मक बेरोजगारी असे म्हणतात. (येथे घर्षण जुन्या व नव्या उद्योगांमध्ये निर्माण झालेले असतात.)

8) संरचनात्मक बेरोजगारी :-

- विकसनशील देशांमध्ये उत्पादनक्षमता कमी असते. उत्पादन क्षमतेच्या कमतरतेमुळे निर्माण होणारी बेरोजगारी म्हणजे संरचनात्मक बेरोजगारी होय.

मराठवाडा हा महाराष्ट्राच्या गोदावरी खो-यात आणि आसपास वसलेला एक प्रदेश असून आठ जिल्ह्यांचा त्यात समावेश होतो. औरंगाबाद शहर हे ह्या विभागाचे मुख्यालय आहे. महाराष्ट्रातली 16.64 टक्के लोकसंख्या या विभागात राहते. त्यापैकी 30 टक्के लोक आर्थिकदृष्टीने दारिद्र्य रेषेखालील आहेत विभागाचा 30 टक्के भाग पर्जन्यछायेत येतो. कोरडवाहू शेतीचे प्रमाण 90 टक्के आहे शेतीच लोकांच्या

निर्वाहाचा प्रमुख स्त्रोत आहे. औरंगाबाद, नांदेड आणि लातूर ही विभागातली उद्योग, शिक्षण आणि पर्यटनाची मुख्य केंद्रे आहेत. पैठणचे सातवाहन ते देवगिरीेच यादव हा ऐतिहासिक काळ मराठवाडा विभागाच्या राजकीय उत्कर्षाचा काळ होता पैठणचे आर्थिक महत्व पण मोठे होते.

स्वातंत्र्यापुर्वी मराठवाडा प्रदीर्घकाळ (निजामाच्या) हैद्राबाद संस्थानाचाच भाग होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या बरोबरीनेच हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढला गेला. स्वामी रामानंद तीर्थ हे हैद्राबाद मुक्ती संग्रामचे अध्वर्यू होते. 17 सप्टेंबर 1948 रोजी हैद्राबाद राज्य निजामापासून मुक्त केले गेले. 1 नोव्हेंबर 1956 पासून मराठवाडा विभाग मुंबई राज्यास जोडण्यात आला. 1 मे 1960 पासून मराठवाडा हा नविन महाराष्ट्र राज्याचा भाग झाला.

मराठवाड्याचे क्षेत्रफळ 64.590 कि.मी. एवढे असून येथील लोकसंख्या 1,87,31,872 (2011) आहे. घनता 354/ ख़्थ्र्2 आहे. तसेच मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे आहेत. ते पुढील प्रमाणे – 1) औरंगाबाद, 2) जालना, 3) बीड, 4) उस्मानाबाद, 5) लातूर, 6) नांदेड, 7) परभणी व 8) हिंगोली.

प्रस्तुत संशोधन मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारीचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा – 2013 – 2023) या विषयावर असून मराठ्वाड्यातील ग्रामीण व नागरी बेराजगारीचे स्वरूप जाणून घेऊन मराठवाड्यातील बेरोजगारांच्या समस्या दूर करण्याच्या अनुषंगाने व विशेषत: नांदेड जिल्हातीत बेरोजगारीची समस्या कमी करण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तूत संशोधन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधनाची उद्धीष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधन करताना पुढील उद्धिष्टे समोर ठेवण्यात आलेली आहेत.

1) मराठवाड्यातील ग्रामीण व शहरी बेरोजगारांच्या आर्थिक समस्या जाणून घेणे.

2) मराठवाड्यातील ग्रामीण व शहरी बेरोजगारीचे स्वरूप जाणून घेणे.

3) मराठवाड्यातील बेरोजगारांच्या समस्यांचा त्यांच्या राहणीमानावर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

4) मराठवाड्यातील ग्रामीण व शहरी बेरोजगारीच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

5) मराठवाड्यातील ग्रामीण व शहरी बेरोजगारांच्या समस्येवरील उपाययोजना सुचविणे.

6) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी बेरोजगारांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजना सुचविणे.

7) नांदेड जिल्ह्यातील बेरोजगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

गृहीतके:-

1) मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

2) मराठवाड्यातील ग्रामणी व नागरी बेरोजगारांचे प्रमाण वाढत आहे.

3) मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेकारीमुळे नागरिकांच्या आर्थिक समस्या वाढत आहेत.

4) मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेकरीमुळे नागरीकांचे सामाजिक स्थान घसरत आहे.

5) मराठवाड्यातील बेकारीमुळे नागरिकांच्या कुटूंबातील व्यक्तींच्या राहणीमानाचा दर्जा घसरत आहेत

6) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत.

7) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती हलाखीची होत चालली आहे.

संशोधन पद्धती:-

प्रस्तुत संशोधन पद्धतीचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम सामग्री संग्रहण पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

प्राथमिक सामगी:-

प्राथमिक सामग्रीमध्ये प्रस्तुत संशोधन करताना मराठवाड्यातील ग्रामीण व शहरी विशेषत:- नांदेड जिल्ह्यातील बेरोजगारांचा समस्या जाणून घेण्यासाठी प्रश्नावली व मुलाखत तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

दुय्यम स्त्रोत:

दुय्यम सामग्रीमध्ये प्रस्तुत संशोधनावर आधारीत महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, मानव विकास अहवाल, जिल्हा रोजगार कार्यालय व बेकारीशी संबंधीत विविध संस्था व अहवालाच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाणार आहे.

नमुना निवड:-

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यात नांदेड जिल्ह्यतील ग्रामीण व नागरी बेरोजगारांची सर्वेक्षण पद्धतीने नमुना निवड पद्धतीद्वारे संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. यासाठी एकूण बेरोजगारांच्या

आकडेवारीनुसार सूक्ष्म पद्धतीने संभाव्यता नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी सांख्यिकीय पद्धतीचा वापर केला जाईल जसे सरासरी, टक्केवारी, साधी वाढ आणि प्रमाण विचलन या तंत्राचा वापर केला जाईल.

संशोधन अभ्यासाचा कालावधी :-

प्रस्तुत संशोधनासाठी 2013 ते 2023 ही कालमर्यादा आहे.

अध्ययनाचे महत्व किंवा आवश्यकता :-

1) मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांच्या भविष्याकालीन समस्या लक्षात घेता येईल.
2) मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर होणारा परिणाम लक्षात घेता येतो.
3) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांच्या समस्या अभ्यासून त्या समस्यांच्या स्वरूपावर प्रकाश टाकता येईल.
4) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांच्या परिस्थितीचा आढावा घेता येईल.

संशोधनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन करताना ज्या समस्या निर्माण होणार आहेत त्याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

1) मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी भागातील असे सर्व बेरोजगारांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

2) मराठवाड्यातील बेकारांची नोंदणीकृत आकडेवारी नुसारच प्रस्तुत संशोधन करण्यात येईल.

3) प्रस्तुत संशोधनामध्ये गोळा केलेली प्राथमिक सामग्री ही मुलाखत दात्याच्या मानसिकतेवर आधारित आहे.

4) प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र हे मराठवाड्यातील फक्त नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

5) ग्रामीण व नागरी बेकारांची सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर प्रस्तुत संशोधन अवलंबून आहे.

6) प्रसत्ुत संशोधन हे फक्त ग्रामीण व शहरी बेरोजगारांच्या समस्येवरच अवलंबून आहे.

वर्षनिहाय संशोधन विषयाचे नियोजन:-

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी पुढीलप्रमाणे कालावधीची विभागणी करण्यात आलेली आहे.

- माहिती संकलनासाठी – 04 महिने
- प्रकरण 1 व 2 साठी – 04 महिन
- प्रकरण 3 व 4 साठी – 04 महिने
- प्रकरण 5 व 6 साठी – 05 महिने
- प्रकरण 7 साठी – 02 महिने

प्रकरण विभागणी :–

प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणांची विभागणी पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले – प्रस्तावना

प्रकरण दुसरे – संशोधन साहित्याचे अवलोकन व संशोधन पद्धती

प्रकरण तिसरे – मराठवाड्याची सामाजिक व आर्थिक स्थिती

प्रकरण चौथे – मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांचे स्वरूप व समस्या

प्रकरण पाचवे – नांदेड जिल्हातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती

प्रकरण सहावे – ग्रामीण व नागरी बेरोजगारी कमी करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेचा अभ्यास.

प्रकरण सातवे – नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी बेरोजगारांची समस्या

प्रकरण आठवे – सारांश, निष्कर्ष व शिफारशी.

संदर्भ ग्रंथ सूची :-

1) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी.

2) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई.

3) लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

4) उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

5) संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे – डॉ. प्रदीप आगवाले, विद्या प्रकाशन, नागपूर.

6) संशोधन पद्धती – डॉ. एस.के.ढगे, डॉ. सी.पी.हासे, के.एस. पब्लिकेशन, पुणे.

7) नायर आर. रामचंद्रन (1994) – हिस्ट्री, एकोनॉमिक्स एण्ड सोशॅलॉजी ऑफ हायर एज्यूकेशन इन इंडिया: युनि न्युज ए.आय.यु., 21 मार्च 1994

8) श्री पाठक पी.डी. (1985) - भारतीय शिक्षा और उसकी समस्याँए, विनोद पुस्तक मंदीर, रांगेय राघव मार्ग आगरा.

9) दत्त एवम् सुंदरम् - भारतीय अर्थव्यवस्था.ृ

10) देसाई भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन.

11) Economic Survey of India Govt. of India

परिशिष्ट – नमुना प्रश्नावली

-: संशोधक : –

मोहम्मदी कौसर सलीम खान

– : मागर्दशक : –

प्रा . डॉ . अजय प्रभाकर कुंटे

अर्थशास्त्र विभागप्रमूख,

नारायणराव वाघमारे महाविद्यालय,

आखाडा बाळापूर, ता . कळमनुरी, जि . हिंगोली